ISSN 2231-1629
Knowledge Resonance
IMPACT FACTOR 8.072
January - June 2021- Vol. 10 No. 1

# ''महाराष्ट्र शासनाचे आरक्षण धोरण आणि अंमलबजावणी''

**रवि जाधव**
संशोधक विद्यार्थी राज्यशास्त्र विभाग,
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद

★★★

**सारांश** – भारतातील बहुतांश राज्यांमध्ये ''सामाजिक आरक्षण'' हा मुद्दा मागील काही वर्षात खूप वादग्रस्त बनत चालल्याचे दिसून आले आहे. विषेशतः शासकीय भरती व शैक्षणिक संस्थांमध्ये मोजक्या जाती समुदायांना असलेल्या आरक्षणांचा पुर्नमांडणी केली पाहिजे, सवलती कमी केल्या पाहिजेत, संपल्या पाहिजेत अथवा नवीन जाती समुहांना आरक्षण देण्यात यावे. अशा प्रकारची मागणी सध्या भारतीय जनमाणसात पुढे येतांना दिसून येते आहे.

**प्रस्तावना** – भारत हा प्राचीन एक खंडप्राय देश असून प्राचीन काळापासूनच सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक दृष्ट्याा वैविध्यपूर्ण असा देश म्हणून जगभर भारताची ओळख राहिलेली आहे. अर्थात येथील समाज व्यवस्था ही खूप जुनी आणि वैशिष्ट्यापूर्ण राहिलेली आहे. भारतात मागील हजारो वर्षापासून वर्णभेद, उच्च, निच अस्पृष्यता इत्यादी प्रथा समाज व्यवस्थेच्या अभिन्न अंगाच्या स्वरुपात कायम होत्या. या अनुशंगाने तत्कालीन समाज व्यवस्थेत ब्राम्हण, क्षत्रिय, वैश्य आणि शुद्र असे चार प्रमुख वर्ण अस्तित्वात होते. यातील शुद्र वर्णातच बहुतांश मागासवर्गीय जाती, जमातींचा समावेश होतो. अशाप्रकारे जाती समुदायांना भारत स्वातंत्र्य होण्याच्या हजारों वर्षापुर्वी पासून त्यांचे शोषण आपल्या समाजातील उच्चवर्णीय समाजाने केल्याचा इतिहास आहे. अर्थातच तत्कालीन समाजाने त्यांना सामाजिक, आर्थिक आणि शैक्षणिक सोयी–सुविधांपासून नेहमी वंचितच ठेवण्याचा प्रयत्न केलेला असल्याचे आजवरच्या ऐतिहासिक पुराव्यावरुन अनेकवेळा सिद्ध झाल्याचे पाहावयास मिळते.

**महाराष्ट्रातील आरक्षणाची सुरुवात** – ऐतिहासिकदृष्ट्या अनेक वर्षापासून तत्कालीन समाज व्यवस्थेने शुद्र, अस्पृष्य आदिवासी, मागासवर्गीयांनी त्यांचे मुलभूत हक्क नाकारले होते. त्यांना कोणतीही मदत मिळू न देता, गुलाम बनवून ठेवण्याचा प्रयत्न केला जात असे. अशा प्रकारच्या सामाजिक व्यवस्थेत महाराष्ट्रातच नव्हे तर संपूर्ण भारतात प्रथमच 1882 रोजी ''हंटर शिक्षण आयोगाला'' दिलेल्या निवेदनात महात्मा फुले यांनी म्हटले होते की, प्रशासनातील वरिष्ठ अधिकारी, पदे ही समाजातील विशिष्ट समुदायाची मक्तेदारी, असून सरकारी नोकऱ्यांच्या क्षेत्रात मागासवर्गीयांना वाव (जागा) उपलब्ध करुन द्याव्यात अशी विनंती केली होती. शिवाय तत्कालीन ''शिक्षण व्यवस्था'' ही काही मुठभर लोकांची मक्तेदारी बनलेली असल्याने मागासर्गीयांना बहुतांश क्षेत्रात प्रतिनिधित्व मिळत नसल्याचे ही स्पष्ट केले होते.

तद्नंतर कोल्हापूर संस्थानचे राजे छत्रपती शाहू महाराज यांनी आपल्या संस्थानातील प्रशासनात 50 टक्के जागा मागासलेल्या जातींसाठी राखून ठेवण्याचा क्रांतीकारी निर्णय घेतला. त्या काळच्या संदर्भात हा निर्णय मागासवर्गीयांसाठी ऐतिहासिक स्वरुपाचा ठरला. याशिवाय संबंधित निर्णयाची अंमलबजावणी करण्यासाठी उपाययोजना म्हणून मागासलेल्या समाजात शिक्षणाचा प्रसार होण्यासाठी शिक्षणाचा खेडोपाडी प्रचार केला. तसेच उच्च शिक्षण घेण्यासाठी प्रत्येक जातींसाठी स्वतंत्र वसतिगृहाची निर्मिती केली. अर्थातच संस्थानातील बहुजनांसाठी खास सवलती जाहीर करुन त्यांना इतर विकसित उच्चवर्णीय जातींच्या बरोबर आणण्यासाठी आरक्षणाची व्यवस्था स्वातंत्र्यपूर्व काळातील आरक्षणाचा वारसा भारताच्या स्वातंत्र्यानंतरही चालू रहावा यासाठी अहोरात्र कष्ट घेणारे तिसरे व्यक्ती म्हणजे राज्यघटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव घेतले जाते. ज्या समाजाला शतकानुशतके सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक अधिकारापासून वंचित ठेवण्यात आले होते. अशा मागासवर्गीय जात समुहाला केंद्र शासनाच्या आरक्षण धोरणाद्वारे प्राधान्यक्रम मिळवून दिला. शिवाय भारतीय राज्यघटनेत अशा मागास जातींसाठी विशेष तरतूद करुन शिक्षण व नोकऱ्यांत राखीव जागा ठेवणे शासनाला बंधनकारक ठरवले.

**आरक्षण म्हणजे काय** – किमान प्रतीनिधीत्वाची संधी मिळणे म्हणजे आरक्षण होय (Minimum opportunity for representation) अशा लोकांचे प्रतिनिधीत्व ज्यांना तत्कालीन समाजव्यवस्थेने हजारो वर्ष, अनेक पिढ्याांना त्यांच्या मुलभूत हक्कापासून, विकासापासून वंचित ठेवले होते. त्यांच्या उत्कर्षाची कल्याणाची जी संधी नाकारत होती. अषा समाजाला राजकारणात, शिक्षणात व सरकारी नोकऱ्यांत किमान प्रतिनिधीत्व मिळावे यासाठी राज्यघटनेतील कलमान्वये आरक्षणाची व्यवस्था शासनाला बाध्य करण्यात आलेली आहे.

**आरक्षणाचे प्रकार** – शासनाच्या आरक्षण धोरणातील तरतूदीनुसार महाराष्ट्रात तीन प्रकारचे आरक्षण लागू आहे ते खालीलप्रमाणे –

1. राजकीय आरक्षण (निवडणूकीतील जागा आरक्षित ठेवणे.
2. शैक्षणिक आरक्षण (शैक्षणिक संस्थामध्ये जागा राखीव ठेवणे)
3. नोकरीतील आरक्षण (शासकीय भरतीत आरक्षित प्रवर्गासाठी जागा रिक्त ठेवणे.)

वरील प्रकारचे आरक्षण महाराष्ट्र शासनाच्या धोरणात उल्लेखित केलेले आहे. यातील शैक्षणिक व शासकीय नोकऱ्यांमधील आरक्षणाला कोणतीही कालमर्यादा ठरवण्यात आलेली नाही. मात्र भारतीय राज्यघटनेच्या कलम 334 अन्वये राजकीय आरक्षणाला फक्त 10 वर्षाची मुदत घातलेली आहे.

**भारतीय राज्यघटना : आरक्षणाच्या तरतुदी** – भारतीय राज्यघटना, वैधानिक कायदे व प्रशासकीय नियमांद्वारे भारतात आरक्षण व्यवस्था लागू करण्यात आलेली आहे. त्यातील प्रमुख तरतुदी खालीलप्रमाणे सांगता येतील.

1 कलम 15 (4) अन्वये सामाजिक व शैक्षणिक दृष्ट्याा मागासलेल्या वर्गाच्या नागरिकांच्या उन्नतीकरीता विशेष तरतुद करण्यात राज्याला प्रतिबंध असणार नाही.

2 कलम 16 (4) अन्वये राज्य शासनाच्या सेवांमध्ये मागासवर्गीय नागरीकांना पर्याप्त प्रतिनिधीत्व मिळालेले नसल्यास, अशा वर्गाकरिता प्रशासकीय पदे राखून ठेवण्यास कोणतीही तरतुद करण्यास राज्याला प्रतिबंध असणार नाही.

3 कलम 36 ते 51 मध्ये तरतुद केलेल्या सामाजिक न्यायाच्या दृष्टीने आर्थिक दृष्ट्याा मागास वर्गाकरीता विशेष तरतुदी आहेत.

4 कलम 330 ते 342 अन्वये भारतातील सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्याा मागासलेल्या आदिवासी प्रवर्गाची स्थिती सुधारण्यासाठी विशेष तरतुदी केल्या आहेत. उपरोक्त हक्कांची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यासाठी आणि मागासलेल्या जाती–जमातींच्या लोकांना समप्रवाहात आणण्याकरीता तसेच त्यांना समाजातील विविध क्षेत्रात समान संधी देण्याकरीता शासनाने आरक्षण धोरणात तरतूदी करणे अत्यावश्यक असते.

**महाराष्ट्रातील आरक्षण :** आरंभी आरक्षण धोरणाचा निकष कमी जासत फरकाने ''जात'' या घटकावर आधारित होता. विषेश म्हणजे समाजातील षोशीत, पिढीत, अस्पृष्य अशा कनिष्ट जाती हाच आरक्षण धोरणाचा मुलभूत पाया होता. मात्र कालांतराने हा निकष बदलत जाऊन शैक्षणिक दृष्ट्याा मागासलेल्या जातींनाही आरक्षण बहाल करण्यात आल्याने आता जवळपास पाऊन शतकाजवळ आरक्षणाचा कोटा येऊन पोहोचला आहे. महाराष्ट्रातील शैक्षणिक संस्था आणि नोकऱ्यांमध्ये विद्यमान आरक्षण धोरणानुसार सर्व प्रवर्गांना मिळून 75 टक्के आरक्षण कोटा निश्चित करण्यता आलेला आहे.

**महाराष्ट्रातील प्रवर्गनिहाय आरक्षण :**

| अ. क्र. | प्रवर्ग | सं. नाव | आरक्षण | जाती | टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| 1 | अनुसूचित जाती | एसी.सी. | 13% | 59 | 11.81% |
| 2 | अनुसूचित जमाती | एस.टी. | 07% | 47 | 9.35% |
| 3 | इतर मागास प्रवर्ग | ओ.बी.सी. | 19% | 346 | – |
| 4 | विषेश मागास | एस.बी.सी. | 02% | 07 | – |
| 5 | विमुक्त जाती (अ) | व्ही.जे. (अ) | 03% | 14 | – |
| 6 | भटक्या जमाती (ब) | एन.टी. (ब) | 2.5% | 37 | – |
| 7 | भटक्या जाती (क) | एन.टी. (सी) | 3.5% | 01 | – |
| 8 | भटक्या जाती (ड) | एन.टी. (डी) | 02% | 01 | 9% |
| 9 | सामाजिक व शै. मा. | एस.ई.बी.सी. | 13% | 01 | – |
| 10 | आर्थिक दृष्ट्याा मागास वर्ग | ई.डब्ल्यू.एस. | 10% | 01 | 32% |

2018 मध्ये महाराष्ट्र सरकारने मराठा समाजाला 13 टक्के आरक्षण दिले. शिवाय महाराष्ट्र शासनाने राज्यातील शासकीय नोकऱ्यात अनाथ व्यक्तीसाठी 3.7 टक्के आरक्षण लागू केलेले आहे.

**समारोप :** महाराष्ट्र राज्य निर्मितीला जवळपास 60 वर्षे पूर्ण होत आली आहेत. या दरम्यानच्या काळात अनेक सरकारांनी आरक्षण ध ोरणाला ज्या पद्धतीने हाताळले अथवा त्याची अंमलबजावणी केली. ते पाहता अजून बरीच वर्षे आरक्षणाचा प्रश्न कायम राहणार आहे असे दिसते. शिवाय आज घडीलाही विषेशतः शासकीय नोकऱ्यांमध्ये ज्या प्रमाणात आरक्षित वर्गाला प्रतिनिधित्व मिळायला हवे होते. ते अजूनपर्यंत मिळालेले दिसत नाही. परिणामी अनेकविध षासकीय विभागात

मागासवर्गीयांचा बॅकलॉग भरणे शासनाला जमलेले नाही. त्यामुळे आरक्षित वर्गाचा अनुशेष अजुन वाढतच आहे. अशातच एकीकडे समाजातील काही नवीन समाजघटकांनी आरक्षणाची मागणी सुरु केली आहे. जसे की, प्रामुख्याने महाराष्ट्रात ''मराठा आरक्षण'' आंदोलनाने तर संपूर्ण समाजमन ढवळून निघालेला पहावयास मिळतो शिवाय धनगर समाज, ओबीसी समाजानेही अनेकवेळा आरक्षणाच्या मुद्द्यांवरुन महाराष्ट्रात तीव्र आंदोलने केलेली आहेत. अर्थातच कमी–अधिक प्रमाणात राज्यात आरक्षणासाठी सातत्याने काही समाज घटकांनी महाराष्ट्र शासनाने आरक्षण धोरण व अंमलबजावणी संदर्भात काही महत्त्वाचे प्रश्न उपस्थित होतात.

तर काहींना मागील आरक्षण बंद करायला पाहिजे अथवा कमी केले पाहिजे यासाठी महाराष्ट्र शासनावर दबाव आणत आहेत. एकूणच आरक्षण धोरणांच्या मुद्यांवरुन बिघडत चालली. महाराष्ट्रातील सामाजिक स्थिती पाहता लवकरच हा आरक्षणाचा मुद्दा सोडवणे आवश्यक आहे. शिवाय काळानुरुप आरक्षण धोरण आखूण त्याची अंमलबजावणी करणे महत्त्वाचे बनले आहे.

शासन धोरणाची चर्चा आपणास शासनाच्या वर्गीय व जातीय चारित्र्याचा शोध घेण्यास भाग पाडतो. विद्यमान महाराष्ट्र शासन लोकशाही पद्धतीने कार्य करत आहे. यात वरचढ जातींचे उच्चभू केंद्रस्थानी असतात तर इतर जातीतील उच्चभू सत्तांतर रचनेमध्ये निम्नस्तरवर असतात. अशा शासनाचा आधार जातीवर उभ्या हित संबंधाचा सौदा हा असतो त्या विरोधात राजकीय लढा उभारणे आवश्यक ठरते.

***संदर्भग्रंथ :***

1. *फडके य. दि. (2006), राखी जागाचे शंभर वर्षे, सुगावा प्रकाशन, पूणे.*
2. *कराडे जगन्नाथ, (2005), आरक्षण धोरण आणि वास्तव, सुगावा प्रकाशन, पूणे.*
3. *सिंह श्यामनंदन, (2007), भारत में आरक्षण निमि, प्रिन्टवेल प्रकाशन, जयपूर.*
4. *मोरे सुबोध, (1999), आरक्षण, भ्रम आणि वास्तव, निर्माण प्रकाशन, नवी मुंबई.*
5. *महासंचालक, (2016), आरक्षण धोरण, डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन आणि प्रशिक्षण संस्था, बार्टी, पूणे.*
6. *सुमंत यशवंत, दत्तात्रय पुंडे, (2006), महाराष्ट्रातील जातीसंस्था विषयक विचार, प्रतिभा प्रकाशन, पूणे.*
7. *आगलावे प्रदिप, (2010), सामाजिक संषोधन पद्धतीशास्त्र व तंत्रे, श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर.*
8. *Pai Pandiker, The Politics of backwardness : Reservation Policy in India, Kanark Publishers, New Delhi.*

9- *www.esakal.com/saptarang-pro-prakashpawar.*

10- *www.prabodhan-blogspot.com vkj{k.k vkf.k N«kirh ‘kkgw egkjkt] foosd ?kVfoYkdj-*